**Department of Geography**
**Event/Activity details**
**2022-23**

| | |
|---|---|
| Event Tile | Basic Training Program on Disaster Management |
| Organized By | Department of Geography |
| Date Of Organization | 23 November 2022 |
| Funding Agency | Sangola College, Sangola |
| Collaboration/MOU | |
| Description | "Basic Training Program on Disaster Management" organized by the dept. of Geography.<br>*PSI Shri. Mahesh Shinde* (5 Battalion NDRF, Pune) and his team demonstrated to the students first aid procedures as well as rescue operations against natural and man-made calamities. |
| Photographs | |




*PSI Shri. Mahesh Shinde (5 Battalion NDRF, Pune) and his team demonstrated the first aid procedures after cardiac arrest to the students.*



दैनिक जनसत्य
नि:पक्ष नजर...,नि:पक्ष खबर...

# सांगोला महाविद्यालयात राष्ट्रीय आपत्ती दलाचे प्रशिक्षण

जनसत्य प्रतिनिधी

**सांगोला :** सांगोला तालुका उच्च शिक्षण मंडळाचे, सांगोला महाविद्यालय, सांगोला भूगोल विभाग, एन.सी.सी. व एन.एस.एस. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२३ नोव्हेंबर, २०२२ रोजी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एन.डी.आर.एफ.) आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण महाविद्यालयात आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव मा. म.सि. झिरपे सर होते. तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ५ बटालियन एन.डी. आर.एफ पुणे, पोलीस सब इन्स्पेक्टर मा.श्री. महेश शिंदे हे होते. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी प्रभारी प्राचार्य डॉक्टर सुरेश भोसले, एन.सी.सी. व भूगोल विभागप्रमुख कॅप्टन संतोष कांबळे, एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी डॉक्टर बबन गायकवाड, प्रा. सचिन सुरवसे उपस्थित होते.

आपल्या अध्यक्षीय मनोगतात संस्थेचे सचिव मा. म.सि.झिरपे सर यांनी विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्व सांगताना विद्यार्थ्यांनी प्रसंगावधानता दाखवून स्वत:चे व समाजाचे संरक्षण करण्याचे आवाहन केले. प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश भोसले यांनी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाने केलेल्या कार्याचा गौरवोद्गार करत महाविद्यालयात त्यांचे स्वागत केले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ५ बटालियन एन.डी.आर.एफ. पुणे, पोलीस सब इन्स्पेक्टर महेश शिंदे यांनी विद्यार्थ्यांना प्रथमोपचार करण्याच्या पद्धती, तसेच निसर्गनिर्मित व मानवनिर्मित आपत्तीत स्वसंरक्षण कसे करावे याबद्दल सविस्तर प्रात्यक्षिकासह म र्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी आपत्तीत घाबरून न जाता प्रसंगावधान राखून व्यक्तिगत पातळीवर या आपत्तीचा सामना केला पाहिजे असे आवाहन केले. हा प्रशिक्षण कार्यक्रम एन.डी.आर.एफ. च्या एकूण ८ जवानांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या आयोजनासाठी ५ बटालियन एन.डी.आर.एफ, पुणे प्रमुख कमांडंट श्री.संतोष बहादूर सिंह, डेप्युटी कमांडंट अनंता बाभूळकर, इन्स्पेक्टर सुशांत कुमार सेठी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

Main Edition
Nov 29, 2022 Page No. 5
Powered by : eReleGo.com